महाराष्ट्र विधानसभा

दिवसाच्या कामकाजाचा क्रम
गुरुवार, दिनांक १५ डिसेंबर, २०१६
(सकाळी ११.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे.

दोन : शोक प्रस्ताव -

ॲड. विठ्ठलराव भैरु पाटील, माजी वि.स.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

तीन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -

(१) **मुख्यमंत्री** : महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाचा दिनांक १ जानेवारी ते ३१ डिसेंबर, २०१५ या कालावधीतील दहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उच्च व तंत्र शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री** :

(क) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा बत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(३) **अन्न व औषध प्रशासन मंत्री** : हाफकिन जीव - औषध निर्माण महामंडळ मर्यादित यांचा सन २०१२-२०१३ व २०१३-२०१४ या वर्षांचा अनुक्रमे एकोणचाळीसावा व चाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(४) **वैद्यकीय शिक्षण मंत्री** : महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा सतरावा वार्षिक अहवाल व लेखे सभागृहासमोर ठेवतील.

(५) **उद्योग मंत्री**	:	(क)	महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा सन २०१२-२०१३ व २०१३-२०१४ या वर्षांचा अनुक्रमे एकावन्नावा व बावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.
		(ख)	महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचा सन २०१३-२०१४ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.
(६) **पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री**	:		पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१३-२०१४ या वर्षाचा पस्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

चार : रोजगार हमी योजना समितीचा तिसरा अहवाल सादर करणे.

पाच : अनुसूचित जाती कल्याण समितीचा चौथा व पाचवा अहवाल सादर करणे.

सहा : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा चौथा अहवाल सादर करणे.

सात : विधानसभा आश्वासन समितीचा सहावा अहवाल सादर करणे.

आठ : विधानसभा विशेषाधिकार समितीचा खालील प्रकरणासंदर्भातील अहवाल सादर करणे :-

सन्माननीय विधानसभा सदस्य डॉ.सुनिल देशमुख यांनी श्री.चंद्रकांत गुडेवार, तत्कालीन आयुक्त, अमरावती महानगरपालिका, अमरावती यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

नऊ : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.

दहा : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).

अकरा : औचित्याचे मुद्दे.

बारा : शासकीय विधेयक :

पुर:स्थापनार्थ, विचार, खंडश: विचार व संमत करणे :-

सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५७ - महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०१६.

तेरा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :

(दिनांक ०८ डिसेंबर, २०१६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविलेल्या पंरतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ व २)

(१) **सर्वश्री. मनोहर भोईर, राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, अब्दुल सत्तार, अमित देशमुख, अमर काळे, सुनिल केदार, जितेंद्र आव्हाड, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, संदीप नाईक, किसन कथोरे, राणाजगजीतसिंह पाटील, हसन मुश्रीफ, वैभव पिचड, नरहरी झिरवाळ, सुनिल शिंदे, ॲड. भीमराव धोंडे, सर्वश्री.चंद्रदीप नरके, शरद सोनवणे, शिवाजीराव नाईक, सुरेश लाड, भास्कर जाधव, सदा सरवणकर, सुनिल प्रभू, प्रकाश सुर्वे, सत्यजित पाटील, कुणाल पाटील, संग्राम थोपटे, अमित झनक, अमिन पटेल, डॉ.संतोष टारफे, सर्वश्री. नारायण पाटील, राजाभाऊ वाजे, गणपत गायकवाड, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री प्रकाश आबिटकर, उल्हास पाटील, किशोर पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्य शासनाने ऑनलाईनद्वारे सातबारा उतारे देण्याची केलेली घोषणा, परंतु ऑनलाईन सातबारा आणि ई फेरफारसाठी आवश्यक असलेली यंत्रणा कुचकामी ठरत असल्यामुळे गत सहा महिन्यांच्या कालावधीत तिसऱ्यांदा तलाठयांनी केलेले आंदोलन, हस्तलिखित सातबारा उतारा देण्याचे शासनाने बंद केल्यामुळे तसेच सॉफ्टवेअर मधील वर्कस्टेशन अद्ययावत नसणे, कनेक्टीवीटी नसणे, इत्यादी ४२ प्रकारच्या अडचणी NIC, पुणे यांना कळवूनही त्या अद्यापही सोडविण्यात न आल्यामुळे तलाठी, मंडळ अधिकारी व शेतकरी अडचणीत येणे, या संदर्भात तत्कालीन महसूल मंत्री यांच्यासोबत झालेल्या बैठकीत दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१६ पूर्वी सज्जांची निर्मिती करण्याचे आश्वासन देऊनही त्याची न झालेली अंमलबजावणी, परिणामी तलाठी, मंडळ अधिकारी व शेतकरी यांच्यामध्ये पसरलेला असंतोष, शासनाने या तांत्रिक त्रुटी तातडीने दूर करण्यासाठी करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया."

(२) **सर्वश्री.राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, अब्दुल सत्तार, अमित देशमुख, अमर काळे, सुनिल केदार, वि.स.स तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्य शासनाने कृषी विभागाच्या संशोधन व विस्तार कार्याशी निगडीत असणाऱ्या २६ योजना बंद करण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास येणे, राज्य व जिल्हा पातळीवर समान असणाऱ्या योजना रद्द करुन त्या अन्य कृषी योजनांमध्ये समाविष्ट करुन योजना कमी करण्यात आल्याचे शासनाने स्पष्ट केले असले तरी त्याबाबतची शासनाची असलेली संदिग्ध भूमिका, केंद्र शासनाने या अगोदरच राज्याला विविध कृषी योजनातंर्गत दिल्या जाणाऱ्या निधीमध्ये १३ हजार कोटी रुपयांची करण्यात आलेली कपात, नॅशनल हॉर्टीकल्चर मिशन (एनएचएम) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभासाठीच्या योजना अपुऱ्या निधीअभावी बंद करणे, त्याप्रकारे राज्य शासनानेही कृषी विकासाच्या योजना बंद करण्याची स्वीकारलेली भूमिका, कृषी संशोधन व विस्तार हा कृषी विकासाचा मुख्य पाया असताना, त्याद्वारे राबविल्या जाणाऱ्या योजना या कृषी विकासाला बळकटी देणाऱ्या असल्याने त्याद्वारे कृषी क्षेत्रामध्ये घडून येणाऱ्या शाश्वत प्रगतीला या योजना बंद केल्यामुळे बसणारी खीळ, परिणामी कृषी क्षेत्राचे होणारे नुकसान, याकडे शासनाचे होणारे दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(दिनांक ०९ डिसेंबर, २०१६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविलेल्या पंरतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक ३ व ४)

(३) **श्री.अतुल भातखळकर, प्रा.देवयानी फरांदे, सर्वश्रीमती मनिषा चौधरी, स्नेहलता कोल्हे, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री नरेंद्र महेता, नरेंद्र पवार, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, अब्दुल सत्तार, अमित देशमुख, सुनिल केदार, अमर काळे, सुनिल प्रभू, सुनिल शिंदे, डॉ. मिलिंद माने, डॉ.देवराव होळी, प्रा. राजु तोडसाम, सर्वश्री. संजय पुराम, डी. मल्लीकार्जून रेड्डी, सुधाकर देशमुख, सुधाकर कोहळे, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, जितेंद्र आव्हाड, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, संदीप नाईक, जयदत्त क्षिरसागर, किसन कथोरे, राणा जगजीतसिंह पाटील, हसन मुश्रीफ, पांडुरंग बरोरा, वैभव पिचड, नरहरी झिरवाळ, संग्राम जगताप, अजय चौधरी, विजय रहांगडाले, चरण वाघमारे, बच्चू कडू, शिरीष चौधरी, मोहन फड, महेश लांडगे, विनायकराव जाधव-पाटील, डॉ.अनिल बोंडे, सर्वश्री. राहुल जगताप, राहुल मोटे, चंद्रदीप नरके, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री. संजय केळकर, बळीराम सिरसकर, संजय पोतनीस, सदा सरवणकर, प्रकाश सुर्वे, हितेंद्र ठाकूर, क्षितीज ठाकूर, डॉ. राहूल पाटील,**

सर्वश्री. बाळासाहेब पाटील, सुरेश लाड, भास्कर जाधव, दिपक चव्हाण, हनुमंत डोळस, श्रीमती दिपीका चव्हाण, प्रा.वर्षा गायकवाड, श्रीमती निर्मला गावित, डॉ.संतोष टारफे, सर्वश्री. डी.एस.अहिरे, अमिन पटेल, कुणाल पाटील, मो.आरीफ नसिम खान, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री. तुकाराम काते, अनिल बाबर, अशोक पाटील, ॲड गौतम चाबुकस्वार, ॲड रामचंद्र अवसरे, श्री.अबू आझमी, सर्वश्रीमती तृप्ती सावंत, अमिता चव्हाण, सर्वश्री.सुरेश गोरे, गणपत गायकवाड, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महिला व बालविकास मंत्र्याचे लक्ष वेधतील :-

"राज्यातील विविध भागांमध्ये कुपोषणाची असलेली गंभीर समस्या, गत वर्षभरात कुपोषणामुळे सुमारे १८ हजार बालकांचा झालेला मृत्यु, माहे एप्रिल ते ऑगस्ट, २०१६ या कालावधीत सुमारे ८ हजार नवजात बालकांचा कुपोषणामुळे झालेला मृत्यु, मा.राज्यपाल महोदयांनी दिनांक १४ सप्टेंबर, २०१६ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत निदेश देऊनही त्याची शासनातर्फे अंमलबजावणी न होणे, डीएचआयएस - २ च्या अहवालावरुन राज्यात अर्भक मृत्यूदर ४० पेक्षाही जास्त असणाऱ्या दहा तालुक्यांमध्ये धारणी व चिखलदरा तालुक्याचा असलेला समावेश, तसेच राष्ट्रीय कुटुंब कल्याण आरोग्य सर्वेक्षणामध्ये राज्यातील पाच वर्षाखालील ३६ टक्के मुलांचे वजन व उंची विहित निर्देशांकापेक्षा कमी असल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील बालमृत्युबाबत राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने दिनांक १४ सप्टेंबर, २०१६ रोजी शासनास नोटीस बजावून केलेली विचारणा, राज्यातील नवजात अर्भके, एक ते सहा वयोगटातील बालके, स्तनदा माता, किशोरवयीन मुली इत्यादींसाठींच्या विविध योजनांमध्ये कोटयवधी रुपयांची तरतूद करण्यात येऊनही त्याचा प्रत्यक्षात लाभ न मिळणे, त्यामुळे बालकांचे कुपोषणामुळे होणारे मृत्यु रोखण्यासाठी पोषण आहार योजना अधिक काटेकोर व प्रभावीपणे राबवून तसेच बालकांच्या आरोग्य विषयक तपासण्या करुन औषधोपचार पुरविण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(४) **सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अमर काळे, अमित देशमुख, ॲड. राहुल कुल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"कृषी विभागाने माहे जुलै-ऑगस्ट, २०१६ मध्ये राज्यात मोहिम राबवून दुय्यम मिश्र खतांच्या घेतलेल्या ५४४ नमुन्यापैकी ५४१ नमुन्यांचे कृषी आयुक्तालयाला प्राप्त झालेले अहवाल, त्यापैकी ५०८ नमुन्यांचे अहवाल नकारात्मक असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास येणे, केंद्र शासनाला मिश्र खत मान्य नसताना राज्य शासनाने दुय्यम मिश्र खत कारखान्यांना दिलेले परवाने, दर्जाहीन खत शेतकऱ्यांना विकून खत कंपन्यांनी केलेली

फसवणुक याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या कृषी आयुक्तालयाच्या गुणवत्ता नियंत्रण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता, मिश्र खत निर्मितीची परवानगी देण्यात येऊ नये, अशी कृषी तज्ञांकडून होत असलेली मागणी, याबाबत मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी शासनास दिनांक १५ नोव्हेंबर, २०१६ रोजी पत्राद्वारे संबंधितांवर कारवाई करण्याची केलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”

(५) **सर्वश्री नितेश राणे, विजय वडेट्टीवार, अब्दुल सत्तार, सरदार तारासिंह, शरद सोनवणे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मीरा-भाईंदर महानगरपालिकेचे नगररचनाकार यांनी कमाल जमीन धारणा कायद्याअंतर्गत जमिनी संदर्भात जाणीवपूर्वक अधिकाराचा दुरुपयोग करून ४४ हून अधिक बनावट दाखले देऊन सुमारे ८० लाख चौ. फुट क्षेत्राची शासनाच्या जमिनीवर अनेक विकासकांचे बांधकामाचे आराखडे मंजूर करून केलेला गैरव्यवहार या अनुषंगाने दि. १० नोव्हेंबर २०१६ रोजी ठाणेनगर पोलीसठाणे येथे आर्किटेक्ट व संबंधित विभागाचे अधिकारी / कर्मचारी यांच्या विरोधात नोंदविण्यात आलेला गुन्हा, सदर नगररचनाकाराने अनेक विकासकांबरोबर संगनमत करून कमाल जमीन धारणा कायद्यानुसार दुर्बल घटकांसाठी बांधण्यात आलेली घरे खुल्या बाजारात अपात्र लोकांना विकण्यासाठी केलेले सहकार्य, सदर बाब प्राथमिक तपासणीत उघडकीस येणे, मीरा-भाईंदर महानगरपालिका , वसई-विरार महानगरपालिका व ठाणे जिल्ह्यातील इतर महानगरपालिका मधेही अनेक प्रकरणामध्ये बनावट कागदपत्राचा वापर करून विकासकांना परवानग्या दिलेल्या असणे, अद्यापही सदर प्रकरणी मीरा भाईंदर महापालिकेचे नगररचनाकार, सर्व संबंधित अधिकारी/ कर्मचारी व दोषी विकासकाविरोधात कोणतीही कारवाई न करता शासनाकडून जाणीवपूर्वक मिळालेले संरक्षण या संपूर्ण प्रकरणाची विनाविलंब उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन सर्व संबंधित दोषी विरोधात ठोस कारवाई करण्याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **सर्वश्री. बबनराव शिंदे, गणपतराव देशमुख, दिलीप सोपल, भारत भालके, अनिल बाबर, सुरेश खाडे, शिवाजीराव नाईक, जयकुमार गोरे, धनंजय गाडगीळ, विलासराव जगताप, डॉ.पतंगराव कदम, श्रीमती सुमन आर. आर. पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुर्नवसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सोलापूर जिल्हा हा रब्बी पिकांचा जिल्हा असून परतीच्या पावसावर अवलंबून असणे, या वर्षी सोलापूर जिल्ह्यात परतीचा अजिबात पाऊस पडला नसल्याने ओढे, नाले,

पाझर तलाव, विंधन विहिरी कोरडे पडलेले असणे, शेतकऱ्यांनी पेरण्या केल्यानंतर पाऊस न पडल्यामुळे करपून गेलेली ज्वारी व इतर पिके, गेल्या वर्षीही जिल्ह्यातील सर्वच गावांमध्ये ५० पैसे कमी पैसेवारी शासनाने जाहीर केली असणे, गेल्या दोन वर्षाच्या सततच्या कमी पावसामुळे रब्बी पिके हातची गेल्यामुळे डिसेंबर महिन्यानंतर पिण्याच्या पाण्याची टंचाई व जनावरांच्या चाऱ्याचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा निर्माण होणे, याबाबत शासनाने आतापासूनच दुष्काळी परिस्थितीला तोंड देण्याची नितांत आवश्यकता, त्याचबरोबर उजनीचे पाणी माढा, पंढरपूर, माळशिरस, मोहोळ दक्षिण सोलापूर तालुक्यांना, कुकडीचे पाणी करमाळा तालुक्यास, टेंभू, म्हैसाळ प्रकल्पाचे पाणी सांगोले, मंगळवेढा, माळशिरस तालुक्याला देणे व सिना, भिमा, माण, कोरडा आदि नद्यांवरील बंधाऱ्यास नवीन दरवाजे बसवुन पाणी अडवणे व उपसा सिंचन योजनेच्या वीज बिलात व पाण्याच्या दरात सवलत देण्याची कार्यवाही करण्याची गरज तसेच गेल्या वर्षीचे पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांनी दुष्काळी निधी वा विम्याची रक्कम तातडीने देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची भूमिका व शासनाची प्रतिक्रीया."

(७) **प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"विदर्भ विकास मंडळाच्या अहवालानुसार मराठवाडा आणि उर्वरीत महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भात रस्त्यांच्या प्रचंड अनुशेष असल्याचे नुकतेच उघडकीस येणे, सध्या २००१-२०२१ या रस्ते विकास आराखड्याचे काम सुरु असताना केंद्राच्या रोड काँग्रेसच्या मार्गदर्शक तत्वानुसार आराखड्यातील लांबीचे उद्दीष्ट प्रत्येक जिल्ह्याच्या क्षेत्रफळाप्रमाणे सारखे असावयास पाहिजे असणे, विदर्भ विकास मंडळाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार उर्वरीत महाराष्ट्र व मराठवाडा मिळून भौगोलीक क्षेत्रफळ २ लाख ९ हजार चौरस किलोमीटर व रस्त्याचे उद्दीष्ट २ लाख ४२ किलोमीटरचे म्हणजेच प्रति चौरस किलोमीटर क्षेत्रफळात रस्त्याची लांबी १.१५ कि. मी. असणे, याउलट विदर्भाचे भौगोलीक क्षेत्रफळ ९७ हजार ४०४ चौ. कि. मी. असताना रस्त्याचे उद्दीष्ट ९४ हजार २४१ कि. मी. चे म्हणजेच प्रति चौरस किलोमीटर क्षेत्रफळात ०.९६८ कि. मी. चे असणे, प्रति चौरस कि. मी. १.१५ या उद्दीष्टाला पोहचवण्यासाठी विदर्भासाठी अधिकचे १८ हजार ४५५ कि.मी. रस्त्यांची आवश्यकता असणे, सध्याच्या उद्दीष्टाच्या तुलनेत उर्वरीत महाराष्ट्रात ७८ टक्के , मराठवाड्यात ९१ टक्के तर विदर्भात ७० टक्के रस्ते निर्मीती झालेली असणे, यानुसार विदर्भाचा सुमारे १३ हजार ६५४ कि. मी. रस्त्याचा अनुशेष असणे, विदर्भात डांबरी रस्त्याने न जोडलेल्या खेड्यांची संख्याही उर्वरीत प्रदेशाच्या तुलनेत अधिक असणे, विदर्भातील सुमारे २ हजार गावाना डांबरी रस्त्याने जोडले गेलेले नसणे, यामुळे विदर्भाच्या सर्वांगिण विकासास खिळ बसलेली असणे, सिंचनापाठोपाठ विदर्भातील रस्त्यांच्या

अनुशेषही कायम असून याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची भुमिका."

(८) **सर्वश्री.समीर कुणावार, कृष्णा गजबे, प्रशांत ठाकुर, हरिष पिंपळे, राजेंद्र नजरधने, राजेंद्र पाटणी, प्रा. राजू तोडसाम, ॲड. यशोमती ठाकुर, सर्वश्री. भास्कर जाधव, सुरेश धानोरकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात विदर्भ, मराठवाडा इत्यादी ग्रामीण भागातील शेतकरी व शेतमजूर मागील १०-२० वर्षापासून जेथे जागा उपलब्ध होईल तेथे २०-२५ जनांच्या गटाने झोपडीसदृश्य घरे बांधून राहत असल्याचे निदर्शनास येणे, विज देयक व जमिनीचा कर भरत असूनही त्यांना पिण्याच्या पाण्याची व रस्त्याची सुविधा नसणे, शेतकऱ्यांना जिल्हा परिषदेकडून घरकुल योजनेखाली घरकुल मंजूर असणे, तथापि भूखंड नावावर नसल्याने भूखंडाकरीता रेडीरेकनरच्या दराने पैसे भरण्याकरिता त्यांची आर्थिक क्षमता नसणे, अनधिकृत भूखंड नियमित करण्याच्या विद्यमान शासनाच्या धोरणास अनुसरून मुळात भूखंड नसल्याने घरकुलांपासून वंचित असलेल्या या दारिद्ररेषेखालील जनतेला निवारा देण्याची आवश्यकता, त्यांना परवडणारे घरकुल उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सन २००५ किंवा त्यापुर्वीच्या सर्व अतिक्रमीत जागेवर राहणाऱ्या झोपडपट्टीधारकांवर संबधित भूखंड नियमित करुन घेण्याकरीता रेडीरेकनरच्या दरात किमान ८० टक्के सवलत देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही."

(९) **सर्वश्री शंभूराज देसाई, सत्यजित पाटील, चंद्रदिप नरके, अनिल बाबर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणी पुरवठा मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील ग्रामीण भागात, डोंगरी भागात जलस्वराज्य तसेच शासनाच्या पाणी पुरवठा विभागाच्या तसेच जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून नळपाणी पुरवठा योजनांची करण्यात आलेली कामे, या योजना पूर्ण होऊन अनेक वर्षाचा लोटलेला कालावधी, सध्या ग्रामीण भागातील अस्तित्वात असणाऱ्या सर्व योजना या कालबाह्य तसेच जीर्ण होणे, त्यातच केंद्र शासनाने राष्ट्रीय पेयजल योजनांच्या माध्यमातून नळपाणी पुरवठा योजनांना निधी देणे बंद करणे, त्यामुळे पाटण तालुक्यातील ग्रामीण भागात पाणी पुरवठा योजनांची मोठ्या प्रमाणात दूरवस्था होऊन ग्रामीण भागातील जनतेला पाण्यासाठी अनेक अडचणींचा करावा लागत असलेला सामना, शासनाने पाणी पुरवठा योजनांच्या कामांना अनेक निकष लावल्याने लहान लहान गावांच्या योजनांचा समावेश न होणे, त्यातच या योजनाकरीता केवळ ५५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणे, त्यामुळे ग्रामीण भागातील जीर्ण व नादूरुस्त योजनांची कामे तसेच नव्याने करावयाची कामे तसेच नव्याने करावयाच्या

योजनांची कामे रखडणे, सदरच्या योजना तातडीने करण्याची नितांत आवश्यकता, परंतु याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे ग्रामीण भागातील जनतेमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(१०) **सर्वश्री सुरेश हाळवणकर, रुपेश म्हात्रे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वस्त्रोद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील यंत्रमाग व्यवसाय व त्यावर अवलंबून असलेला सायझिंग प्रोसेसिंग उद्योग अडचणीत आलेला असणे, सिंथेटीक यार्नवर लावण्यात येणारी एण्ट्री डंपिंग डयूटी व सुती कापडाच्या निर्यातीवर आकारण्यात येणाऱ्या अतिरिक्त दरामुळे यंत्रमाग व्यावसायिकांचे मोठया प्रमाणावर होत असलेले नुकसान, इचलकरंजी येथे २ यंत्रमागधारकांनी कर्जाच्या ओझ्यामुळे केलेली आत्महत्या, माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वेळोवेळी यंत्रमागधारकांसाठी कर्जावरील व्याज अनुदान योजना राबविण्याची, तसेच यंत्रमागधारकांना विज दरापोटी प्रति यूनीट १ रुपये यंत्रमागधारकांच्या खात्यावर जमा करण्याची शासनाने केलेली घोषणा, यामुळे राज्यातील इचलकरंजी, भिवंडी, मालेगाव, विटा, धुळे, माधवनगर, मोमिनपुरा, आदि भागातील यंत्रमाग धारकांना सदर सवलतीची असलेली प्रतिक्षा, मंदीमुळे व वीज दर, मंजुरी कच्चा मालाचे वाढते भाव यामुळे गेल्या दोन महिन्यांपासून उपरोक्त सर्व केंद्रातील बंद असलेला यंत्रमाग उद्योग, त्यामुळे वरील घोषणांची पुर्तता करुन राज्यातील वस्त्रोद्योगास व यंत्रमागधारक यांना दिलासा देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

चौदा : सन २००९-२०१०, २०१०-२०११ व २०११-२०१२ या वर्षांच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान.

पंधरा : शासकीय विधेयके :

(अ) पुर:स्थापनार्थ :-

(१) सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५८ – महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१६.

(२) सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५९ – महाराष्ट्र निरसन (द्वितीय) विधेयक, २०१६.

(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-

(१) (क) **सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५४ — महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१६.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ५४ — महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.वीरेंद्र जगताप, श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ५४ — महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(२) (क) **सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५५ — महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०१६.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ५५ — महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ५५ — महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(३) (क) **सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५६ — महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०१६.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ५६ — महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ५६ — महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(बुधवार, दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)

सोळा : श्री. सुनिल प्रभु, डॉ. अनिल बोंडे, श्री. सदा सरवणकर, डॉ. आशिष देशमुख, श्री. सुनिल शिंदे, डॉ. संजय कुटे, डॉ. संजय रायमुलकर, श्री. समीर मेघे, डॉ. शशिकांत खेडेकर, सर्वश्री. राज पुरोहित, सुरेश धानोरकर, अतुल भातखळकर, रमेश लटके, योगेश सागर, मंगेश कुडाळकर, सर्वश्रीमती मनिषा चौधरी, तृप्ती सावंत, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री. अशोक पाटील, सुधाकर देशमुख, तुकाराम काते, विकास कुंभारे, सुनिल राऊत, राजेंद्र पाटणी, प्रकाश फातर्पेकर, समीर कुणावार,

प्रकाश सुर्वे, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. संजय पोतनीस, मंगलप्रभात लोढा, डॉ. सुनिल देशमुख, डॉ. मिलिंद माने, सर्वश्री. कृष्णा खोपडे, सुधाकर कोहळे, कॅ. आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. अमीत साटम, मल्लिकार्जुन रेड्डी, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री. सुधीर पारवे, चैनसुख संचेती, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) :-

"विदर्भातील जलसंपदाचे अपूर्ण प्रकल्प, अनुशेषांतर्गत प्रकल्प, झुडपी जंगलामुळे अडलेले प्रकल्प कार्यान्वित करण्यातील पर्यावरणदृष्टया असलेले अडसर दूर करणे, भूसंपादन व पुनर्वसनाच्या कामाची गती वाढवून पुरेसा निधी उपलब्ध करणे, जलवितरण व लाभक्षेत्र विकास अंतर्गत प्रत्येक महामंडळात स्वतंत्र यंत्रणा निर्माण करणे, कालव्याऐवजी पाईपलाईनने सिंचन करणे, सर्व प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता घेणे, पाणी वापर संस्था, उपसा सिंचन संस्था बळकट करुन शेतकऱ्यांना जलसक्षम करणे, पिण्याचे पाणी, औद्योगिक व कृषी वापराचे पाणी यांचे नियोजन करणे, गोदावरी व तापी खोरे जलनियोजन आराखडा तयार करणे, वैणगंगा व नळगंगा जोडप्रकल्प आणि कन्हान-वर्धा बोगद्याव्दारे नदीजोड प्रकल्पाचा अभ्यास करुन ते तातडीने कार्यान्वित करणे, नागपुरातील मेट्रो रेल्वे व मिहान प्रकल्पाच्या कामातील प्रगती, विदर्भातील नगरपालिकांना हगणदारीमुक्त करणे, भुयारी गटार योजना, भूपृष्ठावरील पेयजल व्यवस्थापन, अंतर्गत रस्ते विकास, खुल्या जागा व विकास क्षेत्रामधील जागा संरक्षित करणे, उद्यान निर्मिती व नदी परिसर यांचा विकास करुन स्मार्ट शहर करण्याकडे शासनाचा असलेला रोख, पंतप्रधान आवास योजना "ब" व "क" वर्ग नगरपालिका क्षेत्रामध्ये कार्यान्वित करणे, वन पर्यटन उद्यान, जंगल सफारी, वन संशोधन, बांबू व वन उत्पादनामधून रोजगार निर्मिती करण्यात शासनाने अग्रेसर राहणे, मुंबईतील उपकरप्राप्त व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने करण्याच्या दृष्टीने प्रशासनिक व तांत्रिक मंजुरीचे निकष सुलभ व शिथिल करण्याची आवश्यकता, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरातील झोपडपट्टीधारकांचे स्थलांतर करुन तेथील जमिनीचे भूसंपादन व तेथील सर्व्हे नं. २३९ वरील जमिनीची पुनर्मोजणी करण्याबाबत लोकप्रतिनिधी व स्वयंसेवी संस्थांकडून होत असलेली मागणी, आरे वसाहतीतील आदिवासी व पात्र झोपडपट्टीधारकांची समस्या व त्यांचे पुनर्वसन, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

सतरा : **सर्वश्री. जयंत पाटील, राधाकृष्ण विखे-पाटील, अजित पवार, गणपतराव देशमुख, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, विजय वडेट्टीवार, शशिकांत शिंदे, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री. जयदत्त क्षीरसागर, बाळासाहेब थोरात, जितेंद्र आव्हाड, प्रा. वीरेंद जगताप, सर्वश्री. भास्कर जाधव, गोपालदास अग्रवाल, डॉ. सतिश पाटील, सर्वश्री अब्दुल सत्तार, राणा जगजितसिंह पाटील, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री दिलीप सोपल, अमिन पटेल, बबनराव शिंदे, सुनिल केदार, राहुल मोटे, मो.आरिफ नसीम खान, हसन मुश्रीफ, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. दत्तात्रय भरणे, धनाजी अहिरे,**

बाळासाहेब पाटील, डी.पी.सावंत, संग्राम जगताप, मधुकरराव चव्हाण, राजेश टोपे, कालीदास कोळंबकर, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. वसंतराव चव्हाण, हनुमंत डोळस, ॲड. के.सी.पाडवी, सर्वश्री. विजय भांबळे, कुणाल पाटील, वैभव पिचड, काशिराम पावरा, संजय कदम, हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, सुभाष ऊर्फ पंडितशेठ पाटील, अमर काळे, अमित झनक, रणजित कांबळे, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ. संतोष टारफे, श्री.शेख आसिफ शेख रशिद, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री. संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, त्र्यंबक भिसे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री. सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, जयकुमार गोरे, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-

"विदर्भ व मराठवाडयातील शेतमालाची अत्यल्प भावात होणारी विक्री,डाळवर्गीय वस्तुंची मोठया प्रमाणात आयात केल्यामुळे तसेच नोटबंदीमुळे शेतकऱ्याच्या सोयाबीन, कापूस, मूग, उडीद व तूर पिकाला मिळणारे अत्यल्प दर, याप्रकरणी शासनाने कोणतीही उपाययोजना न करणे, परिणामी शेतकऱ्यांची व्यापाऱ्यांकडून होणारी पिळवणूक व त्याला शासनाकडून मिळणारे अभय, आरोग्य विभागातील डॉक्टर व पॅरामेडीकल स्टाफच्या अपुऱ्या संख्येमुळे आरोग्य व्यवस्थेचा उडालेला बोजवारा, कार्यरत डॉक्टरांना दुर्गम व ग्रामीण भागात राहण्याच्या सुविधा नसणे, एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध योजना निधीअभावी बंद पडणे, परिणामी आदिवासी भागातील बाल मृत्यु व मातामृत्युचे वाढते प्रमाण, गेल्या वर्षभरात राज्यात १८ हजार बालकांचा केवळ कुपोषणामुळे मृत्यु झाल्याचे शासनाने मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणणे, आयुर्वेदिक डॉक्टरांच्या समस्यांकडे होणारे दुर्लक्ष, कुष्ठरोग्यांचे वाढते प्रमाण, तोतया डॉक्टरांचा सुळसुळाट, अवयवदानातील घोटाळे, रुग्णालयांची अस्वच्छता, खाजगी रुग्णालयांमध्ये रुग्ण हक्कांचे होणारे उल्लंघन, नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गाच्या निर्मितीसाठी शेतकऱ्यांचा जमिनी देण्यास होत असलेला प्रचंड विरोध, शेतकरी जमिनी देण्यासाठी तयार नसताना जिल्हाधिकारी, प्रांत, तहसीलदार यांनी शेतक-यांना खोटी आश्वासने देऊन दिशाभूल करणे, अस्तित्वात असणारा नागपूर-जालना-औरंगाबाद-सिन्नर-घोटी-मुंबई महामार्गाचे चौपदरीकरण केल्यास वाहतूकीची चांगली व्यवस्था निर्माण होऊ शकणे, मागासवर्गीयांच्या शिष्यवृत्ती घोटाळयाची चौकशी करण्यासाठी नियुक्त केलेल्या विशेष कृती दलाने दिनांक २९ ऑगस्ट,२०१६ रोजी सादर केलेल्या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी न करणे, अपंगांना प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने आदेश देऊनही सामाजिक न्याय विभागाकडून आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांना सहकार्य न मिळणे, अनुसूचित जाती तसेच दलित वस्ती सुधारणेसाठी योजना आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार निधी खर्च न होणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

अठरा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-

(मंगळवार, दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेल्या तथापि, पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ ते ५)

(१) **श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, वि.स.स.**

"**कोकणातील सागरी पर्यटनस्थळांचा विकास करण्याबाबत**" या विषयावरील श्री. वैभव नाईक, वि.स.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ५६९७२ ला दिनांक १९ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(२) **श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स.**

"**पालघर जिल्ह्यातील मनोर-वाडा भिवंडी या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**" या विषयावरील श्री. रूपेश म्हात्रे, वि.स.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ६०३९९ ला दिनांक २० जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(३) **श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.**

"**शासनाने क्रीडा स्पर्धा सरावासाठी खेळाडूंना सवलत देण्याचा घेतलेला निर्णय**" या विषयावरील श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स यांचा दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक १७७ मधील प्रश्न क्रमांक ३४६८१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(४) **श्री. विजय काळे, वि.स.स.**

"**पुणे महानगरपालिकेमध्ये टीडीआर गैरव्यवहार झाल्याबाबत**" या विषयावरील श्री. विजय काळे, वि.स.स यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ७०१५५ ला दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(५) **श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, वि.स.स.**

"राज्यात मुख्यमंत्री पेयजल योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत" या विषयावरील श्री. हनुमंत डोळस व इतर वि.स.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ६५२१२ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(६) **श्री. अजय चौधरी, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"महाराष्ट्र गृहनिर्माण प्राधिकरणाच्या अंतर्गत मुंबई शहर व उपनगरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीमध्ये राहणाऱ्या रहिवाशांची जिवीत व वित्त हानी टाळण्यासाठी म्हाडाच्या ३३ (७) अधिनियमान्वये अनेक इमारतींचा पुर्नविकास प्रलंबित असणे, सदर इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी विकासकाने ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन सुमारे ८ ते १० वर्षांचा कालावधी होऊनही इमारतींच्या पुनर्विकासाचे काम प्रलंबित असणे, इमारतीमधील रहिवाशांची पर्यायी व्यवस्था संक्रमण शिबीरात न करता अन्य ठिकाणी सोय करुन त्याचे भाडे रहिवाशांना देण्यात न येणे, परिणामी रहिवाशांमध्ये पसरलेला असंतोष, त्यामुळे शासनाने जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाची कामे तसेच झोपडपट्टी पुर्नविकास योजनेतील कामे मुदतीत पुर्ण न करणाऱ्या विकासकांवर कारवाई करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या नियम ३३(७) व ३३(१०) यामध्ये बदल करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(७) **श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी तालुक्याची सन १८७४ मध्ये तसेच सावली तालुक्याची सन १९९२ मध्ये निर्मिती होवूनही अद्यापि महाराष्ट्र औद्योगिक महामंडळ स्थापन न होणे,ब्रम्हपूरी व सावली हे दोन्ही तालुके धान उत्पादक म्हणून राज्यात प्रसिध्द असून या दोन्ही तालूक्याच्या ठिकाणी एकही उद्योजक उद्योग सुरू करण्यास तयार नसल्यामुळे बेरोजगारांचे रोजगारासाठी शहराकडे होत असलेले स्थलांतर, प्रत्येक

तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक महामंडळ स्थापन करावे असा शासनाचा निर्णय असतांनाही या दोन्ही ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक महामंडळ स्थापन न केल्यामुळे नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, परिणामी ब्रम्हपूरी आणि सावली येथे महाराष्ट्र औद्योगिक महामंडळ स्थापन करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

विधान भवन,
नागपूर,
दिनांक : १४ डिसेंबर, २०१६

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.